**अनुभव...**

वाहतात दिवस,

वाहतात रात्री..

आयुष्यं वाहताना,

हेच डोळे पाहतात !

भेटतात भले,

भेटतात बुरे...

सुखं-दुःखं भेटताना,

अर्थ सगळे कळतात !

येतात आठवणी,

येतात कढ....

असं भरून येताना..

ओंजळ अश्रुफुले भरतात..

फुलतात मळे,

फुलतात बागा..

सभोवार सगळा फुलताना,

मन-हिंदोळे झुलतात.

जुळतात मनं,

जुळतात गाठी..

नाती अशी जुळताना,

स्पर्श खुळे भुलतात !

**- प्रीती देशपांडे**

**http://www.meetipreeti.com/**